**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 19.07.2025** **वार- शनिवार**

---

**उद्‌घोषणा**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात अस्थायी कॅज्युअल रिपोर्टरची सूचि बनविण्याकरिता परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख उद्या म्हणजे 20 जुलै आहे. अर्ज करण्यासाठी newsonair.com या संकेतस्थळावरील वेकन्सीज या टॅबला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी आपण प्रादेशिक वृत्त विभागाच्या 255 10 506 किंवा 255 32 162 या क्रमांकावर देखील संपर्क साधू शकता.

**अन्नप्रक्रिया**

नावीन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी आणि अन्न सुरक्षिततेची खात्री करण्याच्या हेतूनं उद्योग आणि शैक्षणिक संस्थांच्या दरम्यान अधिक प्रभावी संवाद आणि सहकार्य आवश्यक आहे, असं मत केंद्रीय खाद्य

तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालिका डॉक्टर श्रीदेवी अन्नपूर्णा सिंग यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर आणि वैज्ञानिक तसंच औद्योगिक संशोधन परिषदेच्या वतीनं पुण्यात आयोजित अन्नप्रक्रिया उद्योग परिषदेत त्या बोलत होत्या. अडीचशेहून अधिक उद्योजकांचा सहभाग असणारी ही परिषद भारताच्या अन्नप्रक्रिया क्षेत्रात नावीन्य, भागीदारी आणि दीर्घकालीन सहकार्याला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण होती. याप्रसंगी दोन्ही संस्थांच्या दरम्यान तांत्रिक सहकार्य, क्षमता वाढ आणि संयुक्त संशोधन उपक्रमांसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

**पाणी**

पुणे महापालिकेकडून शहरात टँकरद्वारे पाणी पुरवठ्यासाठी विकसित मोबाइल ॲप प्रायोगिक तत्त्वावर बाणेर-बालेवाडी भागात सोसायट्यांना दिल्या जाणाऱ्या टँकरसाठी वापरण्यात येत आहे. पुणे शहरात दररोज सुमारे ३५ हजार टँकर फेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र प्रत्यक्षात किती पाणी पुरवठा होतो याची पडताळणी करण्यासाठी हे ॲप विकसित करण्यात आलं आहे.

**हरकती**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायती समितीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप गट-गण रचनेवर आतापर्यंत ५५ हरकती दाखल झाल्या आहेत. त्यामध्ये सर्वाधिक म्हणजे २६ हरकती खेडमधून तर २१ हरकती हवेलीमधून दाखल झाल्या आहेत. यासाठी अंतिम मुदत परवा सोमवारपर्यंत असून उद्या रविवारी देखील नागरिकांना हरकती दाखल करता येणार आहेत.

**अमली**

नव्यानं स्थापन करण्यात आलेल्या अमली पदार्थ विरोधी कृती दलानं पुण्यातील राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या मुख्यालयातून कामकाजाला सुरुवात केली आहे. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या नेतृत्वाखाली हे कृतिदल काम करणार असून पुणे आणि नागपूरमधील मोठ्या अमली पदार्थ प्रकरणांचा तपास आणि त्यावर कारवाई करेल.

**सभापती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदावर प्रकाश जगताप यांची बिनविरोध निवड झाली. सभापती दिलीप काळभोर यांनी राजिनामा दिल्यामुळं ही निवडणूक घेण्यात आली. शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या

दरम्यान समन्वय ठेवून सेस गळती रोखण्यासाठी प्रयत्न केले जातील असं प्रकाश जगताप यांनी निवडीनंतर बोलताना सांगितलं.

**उपक्रम**

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात आज पालक शाळा हा आगळा वेगळा उपक्रम घेण्यात आला. या माध्यमातून पालकांनी आपल्या काळाप्रमाणं शाळेत जावून शिकण्याचा अनुभव घेतला. आपल्या पाल्यांना कशाप्रकारे अध्यापन केलं जातं, शाळेचं कामकाज कसं चालतं हे पालकांना जवळून पाहता यावं यासाठी या पालकशाळेचं आयोजन करण्यात आल्याचं मुख्याध्यापिका वासंती बनकर यांनी सांगितलं.

**उपक्रम**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोशी इथल्या सावित्रीबाई फुले कन्या शाळेत आज दप्तराविना शनिवार उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. वर्तमान शैक्षणिक वर्षासाठी शालेय मंत्रीमंडळ निवडण्यासाठी एक अभिनव आणि यशस्वी डिजिटल मतदान प्रक्रिया आयोजित करण्यात आली. भारतीय संविधानाचं महत्त्व आणि देशातील निवडणूक प्रक्रिया

याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

**वाचन**

सूर्यदत्त आरोग्य विज्ञान संस्थेच्या फिजिओथेरपी महाविद्यालयामध्ये सलग नऊ तास मौन वाचन महोत्सव आज आयोजित करण्यात आला. दोनशेहून अधिक विद्यार्थी आणि अध्यापकांनी मोबाईल फोन आणि लॅपटॉप दूर ठेवून ९ तास शांतपणे पाठ्यपुस्तकं, स्व-सहाय्यता, व्यक्तिमत्त्व विकासविषयक पुस्तकं, पत्रिका, संशोधन प्रबंध, अभ्यास साहित्य आणि अन्य शैक्षणिक स्रोतांचं वाचन केलं.

**प्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीनं विभागातील यंत्रसामग्री, उपकरणं आणि वाहनांची कार्यक्षमता तपासणं तसंच नवनियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास सक्षम करण्यासाठी विशेष उजळणी आणि प्रशिक्षण सत्राचं आयोजन करण्यात आलं.

यामध्ये अग्निशमन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, घटनास्थळी त्वरीत कृती, तांत्रिक कौशल्यं, आणि विविध उपकरणांच्या वापराबाबत सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आलं.

**पाणीसाठा**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत सुमारे तेवीस टीएमसी म्हणजे 78 टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाला आहे अशी माहिती पाटबंधारे विभागातर्फे देण्यात आली.

पुणे आणि परिसरात उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**